**ठळक बातम्या**

- राष्ट्र प्रथम हेच केंद्र सरकारचं विकासाचं मॉडेल असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पुनरुच्चार
- उद्योगांना त्रास देणाऱ्या आणि ब्लॅकमेल करणाऱ्यांविरोधात मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचे निर्देश
- वरिष्ठ सनदी अधिकारी संजय सेठी यांची एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती
- ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचं निधन

**आणि**

- नागपूरमध्ये सुरू असलेल्या इंग्लंड विरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतापुढं विजयासाठी २४९ धावांचं आव्हान

**<><><><><>**

राष्ट्र प्रथम हे आमच्या सरकारचं विकासाचं मॉडेल आहे. सबका साथ सबका विकास यावर यात भर दिल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केला. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. राष्ट्रपतींचं भाषण प्रेरक, प्रभावी आणि भविष्याची दिशा देणारं होतं. देशाचा विकसित करणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे आणि देशातले युवक विकसित भारत घडवण्यासाठी झटत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात जितक्या गरीबांचं सशक्तीकरण झालं तितकं यापूर्वी कधीही झालं नव्हतं. आमचं विकासाचं

मॉडेल तुष्टीकरणावर नव्हे तर संतुष्टीकरणावर आधारित असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. केंद्र सरकार गरीब आणि वंचितांसह इतर घटकांसाठी केलेल्या विविध कामांची माहिती त्यांनी यावेळी दिली. देशातल्या साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याला सरकारचं प्राधान्य आहे. कौशल्य विकास, आर्थिक सर्वसमावेशन आणि औद्योगिक विकासावर सरकारचा भर आहे, असं ते म्हणाले. गेल्या काही वर्षात मत्स्योत्पादन आणि निर्यात दुप्पट झाली, खेळण्यांची निर्यात तिप्पट वाढल्याचा उल्लेख त्यांनी केला. काँग्रेसच्या राजकारणावर आणि काँग्रेस सरकारच्या कार्यकाळावर त्यांनी सडकून टीका केली. काँग्रेसनं केवळ एकाच कुटुंबाला प्राधान्य दिलं. त्यांनी संविधान निर्मात्यांच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष केलं. सरकारच्या विरोधात बोलले किंवा सरकारच्या भूमिकेला पाठिंबा दिला नाही म्हणून काँग्रेसनं अनेक कलाकारांवर निर्बंध लादल्याची आठवण त्यांनी यावेळी करुन दिली.

**<><><><><>**

उद्योगांना त्रास देणाऱ्या आणि ब्लॅकमेल करणाऱ्यांविरोधात मकोका अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी पोलिसांना दिले आहेत. पिंपरी चिंचवड इथं पोलीस आयुक्तालय इमारतीच्या पायाभरणी समारंभात ते आज बोलत होते. राज्यातली होऊ पाहणारी जागतिक गुंतवणूक लक्षात घेता उद्योगांसाठी अनुकूल वातावरण तयार करणं आवश्यक असल्याचं फडनवीस म्हणाले. उद्योगांना त्रास दिल्याच्या, खंडणीची मागणी केल्याच्या तक्रारी आपल्याला प्राप्त होत असून असे प्रकार यापुढे खपवून

घेतले जाणार नाहीत, असे करणारे महायुतीतल्या घटक पक्षांचे लोक असतील तरीही त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. यावेळी पिंपरी चिंचवडमधल्या अनेक विकास प्रकल्पांचं भूमिपूजन करण्यात आलं. **याप्रसंगी** विविध सायबर गुन्ह्यांमधे बळी पडलेल्या तक्रारदारांना आरोपींकडून हस्तगत केलेली रक्कम मुख्यमंत्र्यांच्या हस्ते परत केली गेली. तसंच फडनवीस यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयातल्या सायबर विभागातल्या पोलिसांचा सत्कार केला.

**<><><><><>**

मराठवाड्याचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी वॉटर ग्रीड, जलयुक्त शिवार या योजना पुन्हा सुरू केल्या जातील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नांदेड इथं झालेल्या सभेत दिली. यासोबतच लाडकी बहीण योजनेसह महायुती सरकारने सुरू केलेल्या कोणत्याही योजना बंद होणार नसल्याचंही शिंदे म्हणाले. शक्तिपीठ महामार्ग जनतेवर लादला जाणार नाही, ज्याठिकाणी याला विरोध आहे, तिथं काम केलं जाणार नाही असं ते म्हणाले.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे चकमक प्रकरणाचा खटला आपल्याला पुढे लढायचा नाही. त्यामुळे तो बंद करण्यात यावा, अशी मागणी शिंदे यांच्या आई वडिलांनी आज मुंबई उच्च न्यायालयात केली.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन सचिव संजय सेठी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी या पदावर लोकप्रतिनिधींची नियुक्ती होत होती, मात्र प्रथमच ही जबाबदारी एका सनदी अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली आहे. राज्य सरकारमध्ये भरत गोगावले यांचा समावेश झाल्यानंतर त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानं हे पद रिक्त होतं.

<><><><><>

ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक आणि लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं आज मुंबईत निधन झालं ते ७४ वर्षांचे होते. गेले काही दिवस त्यांच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार चालू होते. त्यांच्या पार्थिवावर उद्या मुंबईतल्या शिवाजीपार्क स्मशानभूमीत अंतिमसंस्कार करण्यात येतील.

स्थापत्य अभियंता असलेले संझगिरी, मुंबई महानगरपालिकेतून मुख्य अभियंता म्हणून सेवानिवृत्त झाले होते. १९८० पासून त्यांनी विविध वृत्तपत्रातून क्रीडाविषयक लेखन केलं. सलग ११ विश्वचषकांचं वार्तांकन करणारे ते एकमेव पत्रकार मानले जातात. त्यात कपिल देव आणि महेंद्र सिंग धोनी यांच्या नेतृत्वात जिंकलेल्या विश्वचषकांचा समावेश होता. मराठीतलं पहिलं क्रीडा पाक्षिक एकच षट्कारचे कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी काम पाहिलं. क्रिकेटविषयीची त्यांची ४० पुस्तकंही प्रसिद्ध झाली आहेत. त्याखेरीज प्रवासवर्णन, सामाजिक विषयांवरही त्यांनी लेखन केलं. राज्यशासनाचा साहित्य पुरस्कार तसंच पत्रकारिता क्षेत्रातले विविध पुरस्कार त्यांना मिळाले होते. त्यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फड़नवीस,

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पदकतालिकेत पुन्हा तिसऱ्या स्थानावर आला असून महाराष्ट्राकडे सर्वाधिक ८८ पदकं आहेत. त्यात १९ सुवर्ण, ३६ रौप्य आणि ३३ कास्यपदकांचा समावेश आहे.

तीरंदाजीच्या रिकर्व्ह प्रकारात आज महाराष्ट्राच्या शुकमणी बाबरेकर आणि गाथा खडके यांनी मिश्र गटातलं विजेतेपद पटकावलं. तर महाराष्ट्राच्या महिला तिरंदाजांच्या पथकाने सामूहिक रिकर्व्ह प्रकारात बाजी मारली आहे. या पथकात गाथा खडके, वैष्णवी पवार, शर्वरी शेंडे आणि मुक्ता मोदगी यांचा समावेश आहे. महाराष्ट्राचा सुवर्णपदक विजेता नेमबाज पार्थ माने याने या स्पर्धेच्या अनुभवाविषयी सांगितलं…

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडनं भारतापुढं विजयासाठी २४९ धावांचं आव्हान ठेवलं आहे.
नागपूरच्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या मैदानावर आज दुपारी सुरु झालेल्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि ४७ षटकं ४ चेंडूत सर्व गडी गमावून २४८ धावा केल्या.

भारतातर्फे हर्षित राणा आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. रविंद्र जडेजानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे ६०० बळींचा टप्पा गाठला.
विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात खराब झाली. संघाच्या १९ धावा झाल्या असताना यशस्वी जयस्वाल १७ धावांवर, तर पाठोपाठ रोहीत शर्मा २ धावावर बाद झाला. नंतर श्रेयस अय्यर आणि शुभमन गिल यांनी डाव सावरला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १९ व्या षटकात ३ बाद १२९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या पहिल्या भागात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारी म्हणजेच १० फेब्रुवारीला संवाद साधणार आहेत. परीक्षेच्या ताणाचं व्यवस्थापन विद्यार्थ्यांना करता यावं या दृष्टीनं प्रधानमंत्री या कार्यक्रमातून मार्गदर्शन करतात. नवी दिल्लीच्या भारत मंडपम् मधे होणाऱ्या या कार्यक्रमात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातले प्रत्येकी ३६ विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. यंदा या कार्यक्रमाचे एकूण ८ भाग होणार असून उर्वरित भागात विविध क्षेत्रातल्या महत्त्वाच्या व्यक्ती त्यांचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगणार आहेत.

<><><><><>

शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. सर्वच शिव पाणंद आणि शेत

रस्त्यांची हद्द निश्चित करुन त्यांची काम दर्जेदाररित्या पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र हवामान कोरड राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**